महाराष्ट्र शासन – सार्वजनिक आरोग्य विभाग
राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी कार्यालय,
डॉ. नायडू सांसर्गिक रुग्णालय आवार, केनेडी रोड, पुणे -४११ ००१

**डॉ.मधुकर शि.पवार**
उपसंचालक आरोग्य सेवा (आमाजिआ)
तथा उपमुख्य निबंधक
(जन्म व मृत्य) महाराष्ट्र राज्य

कार्यालय ☎ :- ०२० - २६०५९५३०
मा.सं. विभाग ☎ :- ०२० - २६०५८६१०
फॅक्स क्र. :- ०२० - २६०५८२९२
ई-मेल crs_d83@yahoo.com


**परिपत्रक**

जा.क्र.आमाजिआ/कक्ष-८३/मार्गदर्शन/2399-2411/१५
दिनांक:-30/5/२०१५

प्रति,

१) जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा निबंधक जन्म-मृत्यु
जिल्हा परिषद ........... (सर्व)

२) आरोग्य अधिकारी तथा निबंधक जन्म-मृत्यु
महानगरपालिका ............ (सर्व)

३) कार्यकारी आरोग्य अधिकारी तथा निबंधक जन्म-मृत्यु,
बृहन्मुंबई महानगरपालिका, परेल, मुंबई.

४) कार्यकारी अधिकारी तथा निबंधक, जन्म-मृत्यु,
कॅन्टोनमेंट बोर्ड............ (सर्व)

विषय :- केंद्र शासनाने सन २०१५-२०२४ हे "नागरिक रजिस्ट्रेशन दशक" म्हणून घोषित केले आहे त्या अनुषंगाने करावयाची कार्यवाही.

संदर्भ :- १) मा.संचालक आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक, जन्म-मृत्यु, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रं.संआसे/अति.निबंधकजमृ/अ.शा.पत्र-हिंदी/कक्ष-१८/टि-६/४७३/१५, दिनांक १८/२/२०१५.
२) केंद्र शासनाचे अतिरिक्त निबंधक जन्म-मृत्यू यांचे अ.शा.पत्र सं.१०/०४/२०१२-व्हीएस(सीआरएस), दि.०९/०१/२०१५.

उपरोक्त केंद्र शासनाच्या संदर्भ क्र.२ अन्वये केंद्र शासनाने सन २०१५-२०२४ हे दशक **"नागरी नोंदणी रजिस्ट्रेशन दशक"** म्हणून घोषित केले आहे. त्या अनुषंगाने ग्राम पंचायत, पंचायत समिती, नगर पालिका व महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जन्म, मृत्यू व उपजत मृत्यू यांची १००% नोंदणी व नोंदणी झाल्यावर १००% प्रमाणपत्र वितरण होणेसाठी निबंधकानी आपल्या स्तरावरुन खालील मुद्दयावर आधारीत जिल्हा, तालुका, नगरपालिका व महानगरपालिका स्तरावर अधिनियम व नियमाच्या अधिन राहून कृती आराखडा तयार करण्यात येऊन त्याची नियमीतपणे अमंलबजावणी करण्यात यावी.

१. सन २०२० पर्यंत जन्माचे १००% व संस्थेतील सर्व मृत्यूंचे १००% नोंदणी करण्याचे धोरण निश्चित केले आहे.

२. आपल्या कार्यक्षेत्रातील जन्म-मृत्यू घटना घडणा-या सर्व रुग्णालयाची यादी (डेटा बेस) तयार करावी.

३. सर्व रुग्णालयांची यादी प्रत्येक सहा महिन्यातून अद्यायावत करावी. तसेच नव्याने निर्माण झालेल्या नगरपालिका, ग्रामपंचायती याची माहिती या कार्यालयास त्वरित अवगत करावी.

४. मोठया ग्रामपंचायती, नगरपालिका व महानगरपालिका कार्यक्षेत्रातील स्मशानभूमी मध्ये एका कर्मचा-याची नियुक्ती करुन त्यास नमुना क्रं.२ तेथे उपलब्ध करुन द्यावा. व त्यामध्ये प्रत्येक मृत्यूची नोंद घेण्यात यावी. त्या अनुषंगीक माहिती बरोबर भरली असल्याची संबंधीतांना खात्री करणेबाबत सुचित करावे.

५. जिल्हा रुग्णालय, स्त्री रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयामध्ये झालेल्या जन्माची नमुना क्रं.१ मध्ये नोंद घेऊन त्वरित जन्म दाखला वितरीत करावा व वर्षाच्या शेवटी सर्व नोंद वहया निबंधकाकडे पाठवाव्यात.

६. निबंधकाने कार्यक्षेत्रात घडलेल्या सर्व जन्म, मृत्यू व उपजत मृत्यूची १०० टक्के नोंद घेऊन नोंदणीची कार्यवाही झाल्यावर विहीत नमुना क्रं.५ व ६ मध्ये प्रमाणपत्र वितरीत करावे.

७. महानगरपालिका व नगरपालिका यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील सर्व रुग्णालयांना सुधारीत नमुना क्रं.१,१अ, २,३ व ४ यांचा पुरेसा पुरवठा करावा व जन्म-मृत्यूची घटना झाल्यानंतर त्यांचे कडून विहित नमुन्यातच नोंदणी फार्म भरुन घेणेत यावे.

८. जिल्हा, नगरपालिका व महानगरपालिका यांचे स्तरावरुन सन २०१५ ते सन २०२४ हे दशक **"नागरी नोंदणी रजिस्ट्रेशन दशक"** म्हणून घोषित केले आहे. याबाबत व्यापक जनजागृती, प्रसिध्दी करण्यात यावी. तसेच १००% नोंदणी व त्यानंतर प्रमाणपत्र वितरण होणेबाबत संबंधीतांना आदेशित करावे.

९. जिल्हा स्तरावरुन प्रत्येक महिन्यास आपल्या कार्यक्षेत्रातील १०० टक्के जन्म-मृत्यू व उपजत मृत्यूची नोंदणी होऊन १००% जन्म-मृत्यू प्रमाणपत्र वितरीत करणेसाठी 'डाटा प्रक्रिया सहाय्यक, सांख्यिकी अन्वेषक, सांख्यिकी पर्यवेक्षक व सांख्यिकी अधिकारी तथा नोडल अधिकारी जन्म-मृत्यू यांनी प्रत्येक महिन्यास किमान दोन ग्रामपंचायती, एक नगरपालिका व एक महानगरपालिका यांना प्रत्यक्ष भेट देऊन प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपूर्वी या कार्यालयास भेटीचा अहवाल सादर करावा.

१०. अनुपलब्धता दाखला विहित नमुन्यातच संबंधितांना देण्यात यावा व त्या अनुषंगाने आवयक माहिती बरोबर असल्याची सरकारी कागदपत्रांच्या आधारे खात्री करावी.

११. नमुना क्रं.१, १अ, २,३,५ व ६ मध्ये आधार कार्ड नंबर उपलब्ध असल्यास नोंदविण्यात यावा. याबाबत कोणतीही सक्ती करण्यात येऊ नये.

१२. पंचायत समिती स्तरावर प्रत्येक महिन्यास होणा-या ग्रामसेवकांच्या बैठकीस जिल्हा स्तरीय अधिकारी/कर्मचारी तसेच जिल्हा निबंधक व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) तथा जिल्हा अप्पर निबंधक, जन्म-मृत्यू यांचे सोबत १०० टक्के जन्म-मृत्यू नोंदणी व प्रमाणपत्र वितरण होणेसाठी नियीमत आढावा घ्यावा.

१३. पंचायत समिती स्तरावरील विस्तार अधिकारी (आरोग्य) यांना प्रत्येक महिन्यास किमान १०% ग्रामपंचायतीना भेट देऊन जन्म-मृत्यू नोंदणीचे काम अधिनियम व नियमाच्या तरतूदी प्रमाणे नोंदणी घेऊन प्रमाणपत्र वितरीत करणेबाबत नियीमत प्रत्येक महिन्यात आढावा घ्यावा. तसेच तीमाही जन्म-मृत्यू समन्वय समितीची गट विकास अधिकारी तथा अप्पर जिल्हा निबंधक यांचे सहकार्याने आढावा सभेचे आयोजन करावे.

१४. जिल्हा स्तरावर तालुका स्तरावरील सर्व विस्तार अधिकारी (आरोग्य) यांची प्रत्येक महिन्याच्या चौथ्या मंगळवारी आढावा बैठक घेण्यात येऊन सविस्तर गावनिहाय आढावा घेण्यात यावा.

१५. जिल्हा स्तरावर तीन महिन्यातून एकदा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बाल विकास) यांचे सहकार्याने जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जन्म-मृत्यू 'समन्वय समितीची सभा' आयोजित करुन त्यामध्ये १०० टक्के जन्म-मृत्यू नोंदणी, जन्म-मृत्यू प्रमाणपत्र वितरण होण्याच्या दृष्टीने जिल्हयाचा कृति आराखडा तयार करण्याच्या दृष्टीने चर्चा करावी व अहवाल या कार्यालयास सादर करावा.

१६. जन्म-मृत्यूचे दाखले अधिनियम व नियमामध्ये दिलेल्या सुधारीत नमुना (युआयडी) कार्ड नं. (असल्यास) मध्येच देण्यात यावा.

१७. नमुना क्रं.१,१अ,२,३ च्या कायदेशीर भागावर माहिती देणा-याची सही व निबंधकाची सही असणे हे अधिनियम व नियमाने बंधनकारक आहे याची नोंद घ्यावी.

१८. बाळाचे नांव नोंदविताना या कार्यालयाचे दिनांक- २५/०३/२०१५ च्या परिपत्रकात दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने बाळाचे नांवाबाबत घोषणापत्र घेऊन बाळाचे नांव निश्चित झाल्यानंतरच बाळाचे नांव समाविष्ठ करुन जन्म दाखला शक्यतो वितरीत करावा. बाळाच्या नांवाची उशिरा नोंद करताना शाळेच्या दाखल्यावरील बालकाचे नांव तपासून नोंद करावी. जेणेकरुन चुकांचे प्रमाण कमी राहील.

१९. मृत व्यक्तीच्या नावाची नोंद करताना शक्यतो ओळखपत्र, आधार कार्ड नं. (असल्यास) घेऊन नांव बरोबर असल्याची खात्री करुन नोंद करावी. जेणे करुन चुकांचे प्रमाण अल्प राहील.

२०. सन २०१५-२०२४ हे 'नागरीक रजिस्ट्रेशन दशक' म्हणून यशस्वी राबविण्यासाठी आपल्या स्तरावरुन जिल्हयाचा 'कृति-आराखडा' तयार करुन त्या प्रमाणे अंमलबजावणी करावी.

२१. प्रत्येक निबंधक कलम ८ किंवा कलम ९ खाली त्याला देण्यात आलेल्या सर्व माहितीची नोंद त्या प्रयोजनार्थ ठेवण्यात आलेल्या नोंदवहीमध्ये फी किंवा मोबदला न घेता करील आणि तसेच आपल्या अधिकारीते मध्ये होणारा प्रत्येक जन्म व मृत्यू याची स्वतःला काळजीपूर्वक माहिती करुन घेण्याची आणि त्याचप्रमाणे नोंद करण्याची आवश्यकता असलेल्या तपशीलाबाबत खातरजमा करुन त्याची नोंदणी करण्याची कार्यवाही राहील.

२२. नोंदणीच्या नोंदीचे उतारे माहितीदारास द्यावयाचे - जन्माची किंवा मृत्यूची नोंदणी पूर्ण होताच, निबंधक कलम ८ किंवा कलम ९ खाली ज्या व्यक्तीने माहिती दिली असेल तिला, नोंद पुस्तकातून अशा जन्माच्या किंवा मृत्यूच्या संबंधातील विहीत तपशीलाचा उतारा आपल्या सहिनीशी विनामूल्य देईल.

२३. २१ दिवसाचे आत नोंदणी झाली असल्यास पहिले प्रमाणपत्र मोफत वितरीत करावे. अन्म आणि मृत्यू प्रमाणपत्र वितरीत करताना अधिनियम व नियमानुसार प्रमाणपत्रासाठी फी आकारण्यात यावी.

२४. निबंधकाने कार्यालयाचे बाहेर नोंदणी कार्यालय जन्म-मृत्यू असा फलक लावावा व उपस्थित असणारे दिवस व वेळा त्यावर नमूद कराव्यात.

आपल्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या निबंधकाना सोबतच्या केंद्र शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचना पाठविण्यात येऊन त्या प्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सोबत - केंद्र शासनाने दिलेल्या दिनांक ०९/०१/२०१५ च्या पत्राची प्रत योग्य त्या कार्यवाहीस्तव जोडली आहे.

उपसंचालक आरोग्य सेवा
तथा उपमुख्य निबंधक जन्म-मृत्यु
महाराष्ट्र राज्य पुणे-१

प्रत - १) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) जिल्हा परिषद, .......... (सर्व)
२) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालविकास) जिल्हा परिषद, ......... (सर्व)
३) उपसंचालक, आरोग्य सेवा, परिमंडळे .......... (सर्व)

प्रत सादर -
मा.श्री. अ.वि.कदम, अवर सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन, जी.टी.हॉस्पीटल आवार, १० वा मजला, नविन मंत्रालय, मुंबई-१.

मा. संचालक, आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक जन्म-मृत्यु, महाराष्ट्र राज्य, मुंबई-१.

मा. पी.ए.मिनी, उपमहारजिस्ट्रार, सीआरएस, व्हीएस डिव्हीजन वेस्ट ब्लॉक-१, आरकेपुरम, नवी-दिल्ली-११००६६.

## जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ व महाराष्ट्र जन्म-मृत्यू नोंदणी नियम २००० अनुषंगाने करावयाचा कृति आराखडा वर्ष – जाने. ते डिसें. .......

| अ. क्रं. | कृति | विषय | कालावधी | जबाबदार व्यक्ती |
|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा स्तरावरील आढावा बैठक | मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समन्वय समितीच्या (जन्म-मृत्यू) सभेचे आयोजन | मार्च<br>जुन<br>डिसेंबर<br>सप्टेंबर | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बाल विकास), सांख्यिकी अधिकारी तथा नोडल अधिकारी जन्म-मृत्यू, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा) तथा जिल्हा निबंधक जन्म-मृत्यू |
| २ | तालुका स्तरावरील आढावा बैठक | मा.सभापती पंचायत समिती यांचे अध्यक्षतेखाली समन्वय समिती सभा (जन्म-मृत्यू) सभेचे आयोजन. | मार्च<br>जुन<br>सप्टेंबर<br>डिसेंबर | बाल विकास प्रकल्प अधिकारी, (एकात्मिक बाल विकास सेवा योजना), गट विकास अधिकारी तथा जिल्हा अप्पर निबंधक जन्म-मृत्यू, विस्तार अधिकारी (आरोग्य) |
| ३ | ग्राम पातळीवरील आढावा बैठक | मा.सरपंच यांचे अध्यक्षतेखाली समन्वय समिती (जन्म-मृत्यू) सभेचे आयोजन. | मार्च<br>जुन<br>सप्टेंबर<br>डिसेंबर | अंगणवाडी सेविका, ग्रामसेवक तथा निबंधक जन्म-मृत्यू |
| ४ | ग्रामपंचायती व नगरपालिकांना भेटी | जन्म-मृत्यू कामाचा आढावा | मार्च<br>जुन<br>सप्टेंबर<br>डिसेंबर | विस्तार अधिकारी (आरोग्य) पंचायत समिती, सांख्यिकी अधिकारी तथा नोडल अधिकारी जन्म-मृत्यू, डीपीए, सांख्यिकी अन्वेषक व सांख्यिकी पर्यवेक्षक |
| ५ | ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका भेटी | जन्म-मृत्यू कामाचा आढावा | मार्च<br>जुन<br>सप्टेंबर<br>डिसेंबर | जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा निबंधक जन्म-मृत्यू, सांख्यिकी अधिकारी तथा नोडल अधिकारी जन्म-मृत्यू, डीपीए, सांख्यिकी अन्वेषक व सांख्यिकी पर्यवेक्षक |
| ६ | ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका भेटी | जन्म-मृत्यू घटनांच्या नोंदी व प्रमाणपत्र वाटप | प्रत्येक महिन्यात नियमित | जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा निबंधक जन्म-मृत्यू, सांख्यिकी अधिकारी तथा नोडल अधिकारी जन्म-मृत्यू, डीपीए, विस्तार अधिकारी (आरोग्य), आरोग्याधिकारी तथा निबंधक जन्म-मृत्यू ग्रामीण/शहरी |
| ७ | लिंग गुणोत्तरची आकडेवारी | जिल्हा रुग्णालय, स्त्री रुग्णालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथील जन्माचा लिंग गुणोत्तराचा अहवाल | मासिक अहवाल प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत | डीपीए, सांख्यिकी अन्वेषक, सांख्यिकी अधिकारी तथा नोडल अधिकारी जन्म-मृत्यू |
| ८ | जन्म-मृत्यू नोंदवहया कायम स्वरुपी जतन करणे | जन्म-मृत्यू नोंदवहया सुस्थितीत कायम स्वरुपी जतन करणे. | नियमित | आरोग्याधिकारी तथा निबंधक जन्म-मृत्यू, (सर्व) मुख्याधिकारी तथा निबंधक जन्म-मृत्यू, (सर्व) गटविकास अधिकारी तथा जिल्हा अप्पर निबंधक जन्म-मृत्यू, (सर्व) |

उपसंचालक आरोग्य सेवा, (आमाजीआ)
तथा उपमुख्य निबंधक जन्म-मृत्यू
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

## जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ व महाराष्ट्र जन्म-मृत्यू नोंदणी नियम २००० अनुषंगाने करावयाचा कृति आराखडा

**वर्ष – जाने. ते डिसें. .......**

| अ. क्रं. | कृति | विषय | कालावधी | जबाबदार व्यक्ती |
|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा स्तरावरील आढावा बैठक | मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समन्वय समितीच्या (जन्म-मृत्यू) सभेचे आयोजन | मार्च<br>जुन<br>डिसेंबर<br>सप्टेंबर | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बाल विकास), सांख्यिकी अधिकारी तथा नोडल अधिकारी जन्म-मृत्यू, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा) तथा जिल्हा निबंधक जन्म-मृत्यू |
| २ | तालुका स्तरावरील आढावा बैठक | मा.सभापती पंचायत समिती यांचे अध्यक्षतेखाली समन्वय समिती सभा (जन्म-मृत्यू) सभेचे आयोजन. | मार्च<br>जुन<br>सप्टेंबर<br>डिसेंबर | बाल विकास प्रकल्प अधिकारी, (एकात्मिक बाल विकास सेवा योजना), गट विकास अधिकारी तथा जिल्हा अप्पर निबंधक जन्म-मृत्यू, विस्तार अधिकारी (आरोग्य) |
| ३ | ग्राम पातळीवरील आढावा बैठक | मा.सरपंच यांचे अध्यक्षतेखाली समन्वय समिती (जन्म-मृत्यू) सभेचे आयोजन. | मार्च<br>जुन<br>सप्टेंबर<br>डिसेंबर | अंगणवाडी सेविका, ग्रामसेवक तथा निबंधक जन्म-मृत्यू |
| ४ | ग्रामपंचायती व नगरपालिकांना भेटी | जन्म-मृत्यू कामाचा आढावा | मार्च<br>जुन<br>सप्टेंबर<br>डिसेंबर | विस्तार अधिकारी (आरोग्य) पंचायत समिती, सांख्यिकी अधिकारी तथा नोडल अधिकारी जन्म-मृत्यू, डीपीए, सांख्यिकी अन्वेषक व सांख्यिकी पर्यवेक्षक |
| ५ | ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका भेटी | जन्म-मृत्यू कामाचा आढावा | मार्च<br>जुन<br>सप्टेंबर<br>डिसेंबर | जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा निबंधक जन्म-मृत्यू, सांख्यिकी अधिकारी तथा नोडल अधिकारी जन्म-मृत्यू, डीपीए, सांख्यिकी अन्वेषक व सांख्यिकी पर्यवेक्षक |
| ६ | ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका भेटी | जन्म-मृत्यू घटनांच्या नोंदी व प्रमाणपत्र वाटप | प्रत्येक महिन्यात नियमित | जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा निबंधक जन्म-मृत्यू, सांख्यिकी अधिकारी तथा नोडल<br>अधिकारी जन्म-मृत्यू, डीपीए,<br>विस्तार अधिकारी (आरोग्य),<br>आरोग्याधिकारी तथा निबंधक जन्म-मृत्यू ग्रामीण/शहरी |
| ७ | लिंग गुणोत्तरची आकडेवारी | जिल्हा रुग्णालय, स्त्री रुग्णालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथील जन्माचा लिंग गुणोत्तराचा अहवाल | मासिक अहवाल प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत | डीपीए, सांख्यिकी अन्वेषक, सांख्यिकी अधिकारी तथा नोडल अधिकारी जन्म-मृत्यू |
| ८ | जन्म-मृत्यू नोंदवहया कायम स्वरुपी जतन करणे | जन्म-मृत्यू नोंदवहया सुस्थितीत कायम स्वरुपी जतन करणे. | नियमित | आरोग्याधिकारी तथा निबंधक जन्म-मृत्यू, (सर्व) मुख्याधिकारी तथा निबंधक जन्म-मृत्यू, (सर्व) गटविकास अधिकारी तथा जिल्हा अप्पर निबंधक जन्म-मृत्यू, (सर्व) |

उपसंचालक आरोग्य सेवा, (आमाजीआ)
तथा उपमुख्य निबंधक जन्म-मृत्यू
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

स० 10/04/2012 - जीवनांक (सीआरएस) /138
भारत सरकार
GOVERNMENT OF INDIA
गृह मंत्रालय
MINISTRY OF HOME AFFAIRS
भारत के महारजिस्ट्रार का कार्यालय
जीवनांक प्रभाग, पश्चिमी खण्ड-1, रामकृष्ण पुरम्, नई दिल्ली - 110066
OFFICE OF THE REGISTRAR GENERAL, INDIA
V.S. Division, West Block –I, R.K. Puram, New Delhi – 110066
Tele-fax: 26104012 E-mail – drg-crs.rgi@censusindia.gov.in, ajayk.rgi@censusindia.gov.in

दिनांक = 27/01/2015

सेवा मै,

मुख्य रजिस्ट्रार, जन्म और मृत्यु,

विषय: अपर महारजिस्ट्रार के अर्धशाकीय पत्र स0 10/4/2012 – वीएस (सीआरएस) दिनांक 09.01.2015 का हिन्दी रूपान्तर।

महोदय,

अंतर्राष्ट्रीय स्तर पर नागरिक रजिस्ट्रीकरण प्रणाली को सुदृढ़ करने हेतु किये जा रहे प्रयासों को दृष्टिगत रखते हुऐ देश मे सिविल रजिस्ट्रीकरण प्रणाली के अंतर्गत उपयुक्त लक्ष्य हासिल करने हेतु भारत के अपर महारजिस्ट्रार द्वारा सभी मुख्य रजिस्ट्रारों को जारी आ० शा० पत्र 10/4/2012 - वीएस (सीआरएस) दिनांक 09.01.2015 को जारी किया गया था। उक्त पत्र का हिन्दी अनुवाद आवश्यक कार्यवाही हेतु भेजा जा रहा है।

भवदीया

पी० ए० मिनी

(पी० ए० मिनी )
उपमहारजिस्ट्रार, सीआरएस

सलग्न: उपरोक्त

*प्रत्येक जन्म एवम् मृत्यु का पंजीकरण सुनिश्चित करें/*
*"Ensure Registration of Every Birth and Death"*

उपसंचालक
आरोग्य सेवा (आ. मा. जी.आ.)
आवक-जावक 1227
दिनांक :- 21 FEB 2015
शाखा :- कार्य विवरण पत्र
अधिक्षक :-
प्रशासकिय अधिकारी उपसंचालक


दीपक रस्तोगी
**DEEPAK RASTOGI**
भारत के अपर महरजिस्ट्रार
**Additional Registrar General, India**


सत्यमेव जयते

भारत के महारजिस्ट्रार एवं
जनगणना आयुक्त का कार्यालय
गृह मंत्रालय
भारत सरकार
**Office of the Registrar General &**
**Census Commissioner, India**
**Ministry of Home Affairs**
**Government of India**

**अ.शा.पत्र सं.10/04/2012-वीएस(सीआरएस)** दिनांक = 09.01.2015

प्रिय

आपको विदित ही है कि जन्म और मृत्यु रजिस्ट्रेशन (आरबीडी) अधिनियम, 1969 के अंतर्गत जन्म और मृत्यु का अनिवार्य रजिस्ट्रेशन होने के बावजूद, देश जन्म और मृत्यु के सर्वव्यापक रजिस्ट्रेशन का लक्ष्य प्राप्त नहीं कर सका। इसलिए लक्ष्यों को प्राप्त करने के लिए नागरिक रजिस्ट्रेशन प्रणाली को और अधिक सुदृढ़ करना और ठोस प्रयत्न करना अत्यावश्यक है।

2. अंतर्राष्ट्रीय स्तर पर भी नागरिक रजिस्ट्रेशन प्रणाली को और सुदृढ़ करने के प्रयास किए जा रहे हैं। हाल ही में 24-28 नवम्बर, 2014 के दौरान बैंकांक में यूनेस्केप द्वारा एशिया और प्रशांत क्षेत्र में नागरिक रजिस्ट्रेशन और जीवनांक प्रणाली पर एक मंत्रीपदीय सम्मेलन आयोजित किया गया था। भारत ने 2024 तक सर्वव्यापक और अनुक्रियाशील नागरिक रजिस्ट्रेशन के साझे सपने का समर्थन किया है। इस सपने को पूरा करने के लिए निम्नलिखित तीन लक्ष्य निर्धारित किए गए हैं:-

(क) लक्ष्य 1: जन्म, मृत्यु और अन्य जीवन संबंधी घटनाओं का सर्वव्यापक नागरिक रजिस्टेशन;

(ख) लक्ष्य 2: सभी व्यक्तियों को पहचान, नागरिक स्थिति और आगामी अधिकारों के लिए दावा करने हेतु आवश्यक जन्म, *मृत्यु और अन्य जीवन संबंधी घटनाओं के नागरिक रजिस्ट्रेशन के विधिक दस्तावेज* उपलब्ध कराए जाएंगे;

(ग) लक्ष्य 3: रजिस्ट्रेशन रिकार्ड पर आधारित सही, पूर्ण और सामयिक जन्म-मृत्यु आंकड़े (मृत्यु के कारणों सहित) तैयार करके प्रचारित किए जाएंगे।

3. इसके अतिरिक्त, 2015-24 के दशक को "नागरिक रजिस्ट्रेशन दशक" के रूप में घोषित किया गया है। सावधानीपूर्वक विश्लेषण के बाद, भारत ने 2020 तक जन्म के शत प्रतिशत रजिस्ट्रेशन और 2020 तक सभी संस्थागत मृत्युओं के रजिस्ट्रेशन का लक्ष्य प्राप्त करने का अपना एक महत्वाकांक्षी सपना स्वयं निर्धारित किया है। आपसे अनुरोध है कि उपर्युक्त लक्ष्य प्राप्त करने के लिए अपने राज्य की कार्य योजना तैयार करें।

D-83

4. मेरा आपसे अनुरोध है कि आपके द्वारा की गई कार्रवाई से इस कार्यालय को अवगत करवाएं।

सादर।

आपका

ह०

(दीपक रस्तोगी)